विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम डी.बी.टी.व्दारे त्यांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१२०/तांशि-४
शिबीर कार्यालय, दालन क्र.५, हैदराबाद हाऊस,
सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१
दिनांक : १० जुलै, २०१८

संदर्भ :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५/४/२०१७

२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १८/तंशिसं/शा.पत्र/RCSM & DPDV/२०१८/१०५, दिनांक १७/३/२०१८

३) संचालक,तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १८/तंशिसं/शा.पत्र/SCS/२०१८/१६४, दिनांक १९/४/२०१८

परिपत्रक :

उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत “राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना ” राबविण्यात येतात. या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व निर्वाह भत्त्याची रक्कम त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट (DBT) जमा करण्यास संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील मान्यता प्राप्त शिक्षण संस्थांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेशित सामाजिक मागास व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ देण्यात येतो. सन २०१७-१८या शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्ती, पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात थेट जमा करावयाची आहे व विद्यार्थ्यांने त्यामधील शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम शैक्षणिक संस्थेला अदा करणे आवश्यक आहे.

२. मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यात डी.बी.टी.व्दारे दिली गेल्यानंतर संस्थेची शिक्षण शुल्काची रक्कम विद्यार्थी संस्थेला भरणार नाहीत हा मुद्दा शिक्षण संस्था व काही लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला आहे. तसेच हा मुद्दा संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडून मा.मुंबई उच्च न्यायालयातील याचिकेवरील सुनावणी दरम्यान उपस्थित करण्यात आला आहे.

३. तरी याबाबत खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात याव्यात :-

१) विद्यार्थ्यांना मंजूर झालेली शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर, शिल्लक राहिलेली व न भरलेली संस्थेची शिक्षण शुल्काची रक्कम म्हणून संबंधित संस्थेकडे १५ दिवसांच्या आत जमा करावी अन्यथा पुढील शैक्षणिक वर्षी त्यांच्या शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणाचे / पुढील वर्षासाठीचे अर्ज संस्थेकडून स्विकारण्यात येणार नाहीत .

२) संस्थेने, शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त झाल्यानंतर शिल्लक राहिलेली व न भरलेली संस्थेची शिक्षण शुल्काची रक्कम संबंधित संस्थेकडे जमा न केलेल्या विद्यार्थ्यांचे नुतनीकरणाचे / पुढील वर्षासाठीचे अर्ज मंजूर करुन पाठवू नयेत .जर विद्यार्थी अंतिम वर्षामध्ये शिकत असेल तर, सदर प्रकरणी शिल्लक राहिलेली व न भरलेली संस्थेची शिक्षण शुल्काची रक्कम म्हणून संबंधित संस्थेकडे १५ दिवसांच्या आत जमा न केल्यास विद्यार्थ्यांना संस्था सोडल्याचा दाखला (Leaving Certificate) किंवा अंतिम गुणपत्रिका (Marksheet) देऊ नये.

३) विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम डी.बी.टी.व्दारे त्यांच्या बँक खात्यात प्राप्त झाल्यानंतर त्यांनी शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयात न भरल्यास त्यांना पुढील वर्षाची शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येऊ नये .पुढील वर्षी विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरावी व त्यांनी शिष्यवृत्तीसाठी नव्याने अर्ज करावा .

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०७१११७११४७७२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee2301144 8b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.07.11 17:13:25 +05'30'

**( संजय औ. धारुरकर)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
५. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
६. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१,
७. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये,
८. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये,
९. सर्व सहसंचालक, कला संचालनालय विभागीय कार्यालये,
१०. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

११. सर्व अवर सचिव,  उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,
१४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव,
१५. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७. वि.जा., भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये व प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९. का. मशि-४, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०. निवड नस्ती (तांशि-४)